# राशिभविष्य - मे, २०२२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून तो प्रतिकुल असून त्याच्यामुळे पतिपत्नीत गैरसमज, वाद ,भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. शिवाय त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर,चंचल होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत शनि व मंगळ असे दोन शत्रू ग्रह असल्यामुळे अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट-परिश्रम करावे लागतील. शिवाय त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. हा मंगळ शत्रू ग्रह शनिसह असल्यामुळे खर्चात वाढ होईल; पण त्यासाठी आवश्यक तेवढी अर्थप्राप्ती न झाल्यास चिंताग्रस्त व्हाल. पण येथील मंगळामुळे क्वचित कोणास एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. येथील शनि मात्र अनुकुल होईल, व तो चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. येथील मंगळ दिनांक १७ पासून या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत गेल्यावर अधिक प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अर्थहानी, वाद, भांडणे, मानहानी होणे संभवते. जपा. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु अध्यात्म व सामाजिक कार्याची मनापासून आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. शुक्रामुळे मधूनमधून मनोनुकुल घटना घडतील सुख लाभेल. हा शुक्र दिनांक २३ पासून या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. त्यामुळे महिनाअखेरपर्यंत तो सुखकारकच होईल. पण नेपच्यूनमुळे मानसिक व्यग्रता व चिंता अस्वस्थ करतील व त्यामुळे नैराश्य येणे संभवते. . या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत प्रथमपासून रवि -राहू-हर्षल असे तीन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हे तिन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, थकावट, मनस्ताप, भांडणे, आर्थिक चिंता, वित्तहानी अशापैकी घटना घडणे संभवते. पण येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र

असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत प्रथमपासून बुध ग्रह आहेच. तोही दु:खदायकच होईल; पण त्याच्यामुळे धनलाभ होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल आणि मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, कार्यक्षेत्रात सहकार्य लाभेल, मनस्थिती उदार होईल, व क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. . या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी वाद, भांडण होणे संभवते. पण हा मंगळ औषध विक्रेते आणि यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल होण्याची शक्यता आहे. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत जात आहे. त्या काळात तो फारसा अनुकुल झाला नाही तरी त्याच्यामुळे खूप कष्ट -परिश्रम करूनच जरुरीपुरता अर्थलाभ होऊ शकेल. क्वचित कोणास एखादी मौल्यवान वस्तू मिळणेही शक्य दिसते. पण त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेला शनि विशेष करून लोखंड, पोलाद यांचा व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात तो अविस्मरणीय फलदाई होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु-शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होतील व गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींना विवाह योग येईल, शैक्षणिक प्रगती होईल. शुक्रामुळे सर्व प्रकारे सुख व ऐषाराम लाभेल. पण नेपच्यूनमुळे कुमार्गी मित्रांची बाधा होणे संभवते. तसेच आर्थिक नुकसान, अर्थप्राप्तीस विलंब होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत रवि, राहू. हर्षल असे तीन ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या लाभस्थानी असलेला शुक्र या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत येत आहे. येथील रवि-राहू -हर्षल हे तिन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होतील; व त्याच्यामुळेच प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल, शरीरपीडा, थकवा, अनारोग्य, मनस्ताप सहन करावा

लागेल, राहूमुळे तर दिखाऊ सभ्यपणाचे आचरण होईल, पण तो शिक्षण व अर्थलाभ यांस अनुकुल होईल. हर्षलमुळे वाईट प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. शिवाय शत्रुत्व निर्माण होणे, अपघात भय असणे, सांपत्तिक अडचणी निर्माण होणे संभवते. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत बुध असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर, चंचल अशी होईल, आर्थिक नुकसान होणे संभवते, शिवाय मित्रद्रोह होणे, काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना पोटाचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत मंगळ -शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. सबब शक्यतो प्रवास करू नका. येथील शनि मात्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे कायदा, तत्त्वज्ञान अशासारखे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात आहे. त्यावेळीही तो मनस्तापदायकच होईल. व त्याच्यामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा क्रोध सहन करावा लागेल. पण औषध विक्रेते आणि यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना तो काही प्रमाणात अनुकुल होईल. या राशीच्या दशम स्थानी मींन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना अपेक्षित असे नवे कार्यक्षेत्र मिळेल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण शुक्रामुळे कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे त्यांना मनस्ताप सहन करावा लागेल.पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तो या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व काही मनोनुकुल व सुखदायक असेच घडेल. नेपच्यूनमुळे मनस्थिती अस्वस्थ, चंचल अशी होईल. पण तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत रवि -राहू-हर्षल असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील रवि महिन्याच्या

पूर्वार्धातच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा, अनारोग्य, मनस्ताप व मानहानी होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या राहूमुळे संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करील. शिवाय ज्यांच्या हाती अधिकार आहे अशापैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा जबरदस्त मोह होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून तो मोह टाळावाच. तसेच जुगाराचा मोह असणारांनीही त्यापासून दूर राहावे. नपेक्षा नुकसानच होईल व विपरीत असेच घडेल. जपा. हर्षलमुळे निश्चित असे काय घडेल ते सांगता येणार नाही. पण मित्राशी भांडणे होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत बुध असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अपयश, मानहानी, अनारोग्य व आर्थिक चिंता यांचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीजगदंबा दुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीदुर्गा देवी स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नम: " तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी " ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे कसली तरी चिंता त्रस्त करील. तसेच त्याच्यामुळे कोणाशी पटणारच नाही. शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, दु:ख, हाती घेतलेल्या कार्यात अपयश, अपघात भय, काही मंडळींना एखादा विचित्र आजार होणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत जात आहे. त्या काळात शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मनस्ताप, मानहानी होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून गुरु-शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु-शुक्र आणि नेपच्यून हे तिन्ही ग्रह अनुकुल होतील व अध्यात्माची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. सद्गुणांची वाढ होईल. उत्कर्ष होणेही संभवते. गुरुजनांची व थोरामोठयांची कृपा प्राप्त होईल. सुख,समाधान आणि ऐषाराम मिळेल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात अडचणी, अडथळे व दु:खदायक घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे

काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत रवि -राहू-हर्षल असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो अनुकुल होईल व व नोकरी-व्यवसायात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या काही नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ, अधिकार पद क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही शक्य दिसते. काही मंडळींना आर्थिक तर काहींना सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त होईल. राहूसुद्धा असाच अनुकुल होईल व हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. काही मंडळींचा सन्मान होण्याचीही शक्यता दिसते. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर कांहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत बुध असून तोही अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, नवे मित्र मिळतील व धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्राचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे काही तरी कारणाने मानसिक दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. म्हणून मन:शांतीसाठी आवडत्या दैवताची उपासना करा. . या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हा मंगळ प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय हाडमोड होणेही संभवते. तसेच तो व नेपच्यून हे दोन्ही ग्रह जलभयकारक, वीजभयकारक व विषभयकारक असल्यामुळे वीज-पाण्याशी संबंधित अपघात होऊ शकेल. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनिमुळे मनस्थिती शांत पण वृत्ती विचित्र होणे संभवते. विवाहेच्छूंना विवाहयोग येईलच याची खात्री देता येत नाही.

या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरु-शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. शुक्रामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा जास्त अर्थप्राप्ती होईल. पण हा शुक्र या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुल होण्याचीच शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत रवि - राहू - हर्षल असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध अशापैकी घटना घडणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. अर्थलाभ होईल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. कोणाला तरी उच्च पद मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. याला राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून बुध ग्रह आहेच. तोही अनुकुल होईल व त्याच्यामुळे धनवृद्धी होईल व मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराभ्याम नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात अनारोग्य, इजा होणे, आर्थिक हानी होणे, चोरी होणे, अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागणे, अकारण शत्रुत्व निर्माण होणे, गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत गुरु-शुक-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील गुरु-शुक्र हे दोनही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होतील व त्यांच्यामुळे ज्याचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. विवाहेच्छूना विवाहयोग येईल, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, प्रवासाचे योग येतील व विवाहित मंडळींना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान प्राप्त होईल. त्याशिवाय अर्थलाभ होणेही संभवते. येथील नेपच्यून मात्र प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील शुक्र या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत गेल्यावर सुद्धा अनुकुलच होईल व त्याच्यामुळे विविध प्रकारे धनलाभ होणे संभवते. या राशीच्या अष्टम

स्थानी मेष राशीत प्रथमपासून रवि -राहू -हर्षल असे तीन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे हा रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल. व त्याच्यामुळे अनारोग्य, दु:ख, नियोजित कार्यात अपयश, संततिसुखात बाधा, मानसिक ताण, कसली तरी चिंता अशापैकी घटनांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. येथील राहू प्रतिकुलकारक असून त्याच्यामुळे वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा प्रबळ होईल. पण मनावर ताबा ठेवून असा विचार डोक्यातून काढून टाका. तेच सुखाचे होईल. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या अष्टम स्थानी असलेला हर्षल अपघातकारक असल्यामुळे वाहने सतत सावधानतेने चालवा व घरीदारी सर्व ठिकाणी सतत सावधानतेनेच आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत बुध असून त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडथळे, अडचणी, दिरंगाई असे त्रास सहन करावे लागतील. शिवाय त्याच्यामुळे वाद, भांडणे होणेही संभवते. श्रद्धा असेल तर “श्रीदुर्गा देवीची व श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन”शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “दुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. रात्री “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून तो सर्व प्रकारे सुखकारक होईल; पण त्याच्यामुळे वाहनधोका असल्यामुळे सतत सावधानतेने व नियंत्रित वेगातच वाहन चालवा. तसेच रस्त्याने चालत जात असाल त्यावेळी वाहनधोका नसल्याची खात्री करूनच वाटचाल करा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे तो संपूर्ण महिन्याच्या काळात अनारोग्यकारक व संततिसुखाचे दृष्टीने मनस्तापदायकच होईल. तसेच काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करतील. पण शनि संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या पंचम स्थानी स्वतः:च्या कुंभ राशीत असल्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना चिकाटीने कार्यरत ठेवू शकेल. पण या शनीमुळे बुद्धी संशयी, स्वार्थी, व्यवहारी अशी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत गुरु-शुक्र -नेपच्यून असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. तसेच काही मंडळींना फसवणूक झाल्याचा मनस्ताप अस्वस्थ करील. येथील शुक्रामुळे आवडत्या कलेत उच्च प्रगती

झाली असूनही ती व्यक्त करण्यासाठी संधीच मिळणार नाही. येथील शुक्रात शुद्ध प्रेमभावना नसल्यामुळे काही मंडळींवर नसते आळ येणे संभवते. नैराश्य आल्यास काही मंडळी व्यसनाधीन होणेही संभवते. पण गुरुमुळे शारीरिक आरोग्य उत्तम राखण्यास मदत होईल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यावेळी या राशीच्या विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुख मिळेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत प्रथमपासून रवि -राहू व हर्षल असे तीन ग्रह आहेतच. पण येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्च्छा -आकांक्षा अपूर्ण राहणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच मनात कपटी विचार उचंबळून येतील. जपा. येथील हर्षलमुळेही पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी लहरी व विक्षिप्त आचरणामुळे, मतभेदामुळे, वाद, भांडणामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या स्थानी शुक्र येत असल्यामुळे तो अनुकुल होईल व परिस्थितीत सुधारणा होईल. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत बुध असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होऊन सुखसमाधान लाभेल.
श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”:चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी “ओम वायवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत रवि -हर्षल - राहू असे तीन ग्रह असून येथील रवि नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल. शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना अधिकार पद मिळणेही संभवते. पण तो अनारोग्यकारक होण्याची शक्यताही दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. या स्थानी असलेला राहू ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशा मंडळींना लाभदायक होईल. पण तोही अनारोग्यकारकच होईल.

येथील हर्षल सतत खोल विचार करण्याची सवय असणारांना प्रतिकुल होईल व काही मंडळींना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत बुध असून तो दु:खदायकच होईल; पण त्याच्यामुळे धनलाभ होण्याचीही शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह असून येथील गुरु-शुक्र बौद्धिक व कलात्मक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होतील. गुरुमुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत त्यांचे प्रेमसंबंध दृढ होतील. अर्थलाभ होणेही संभवते. येथील नेपच्यून अध्यात्म व गूढ संशोधन यांची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होण्याची व असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे गृहसौख्य हानी होईल व नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथीक मंगळ या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर संतति समस्या त्रस्त करण्याची दाट शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्रा"चा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे प्रवासाचे योग जुळून येतील. शिवाय तो यशदायक, सम्पत्तिदायक व सुखोपभोगदायक होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह काही बाबतीत अनुकुल होतील व मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल व हातून कर्तृत्व घडेल. पण त्याच्यामुळे इजा, दुखापत होणेही संभवते. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत जाईल तेव्हा तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. येथील शनिमुळे या राशीच्या काही मंडळींना अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल. काही मंडळींना मनापासून आवडणारे कार्यक्षेत्र मिळेल पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु- शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. येथील गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील; पण

नातेसंबंधातील कोणाकडून तरी असहय मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल, ऐषाराम प्राप्त होईल, व ज्यांची शेतीवाडी आहे अशा मंडळींना त्यापासून लाभ होईल. येथील नेपच्यूनमुळे घरगुती संबंधात गैरसमज, घोटाळे निर्माण होणे संभवते. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यावेळी तो कलात्मक शिक्षण घेत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत प्रथमपासून रवि -राहू-हर्षल असे तीन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कौटुंबिक त्रास, मुलांपौकी कोणाला आजार, नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत जात आहे, त्यावेळी तो अनुकुल होईल व या राशीच्या दशम स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण तो अनारोग्यकारक होणेही संभवते.या राशीच्या . पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे संततिसुखात व वैवाहिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून बुध ग्रह आहेच. तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना प्रसिद्धी मिळणे व अर्थलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निॠतये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह या राशीच्या मंडळींना प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या दोन्ही ग्रहांमुळे अनारोग्य, आर्थिक चिंता निर्माण होतील व कौटुंबिक जीवनात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत जात आहे. त्यावेळी तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल. हातून कर्तृत्व घडेल. प्रवासयोग येईल. पण त्याच्यामुळे एखादी इजा होण्याची शक्यताही दिसते. या तृतीय स्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून हे तीन ग्रह आहेतच. येथील गुरुमुळे या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. प्रवासाचे योग येतील;

पण एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे या राशीच्या काही मंडळींना धनलाभ होईल, काहींना भूमिलाभ होईल, तर काही मंडळींचा सन्मान होऊन त्यांना प्रतिष्ठा लाभेल. नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल; पण अध्यात्म व गूढ संशोधन यांत रस असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. त्याशिवाय काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात तो अनुकुल व लाभदायक होईल. . या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत रवि -राहू - हर्षल हे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. पण हे तिन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, दु:ख, आर्थिक चिंता, कौटुंबिक त्रास, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल व मन अस्वस्थ राहील व कशातही सुखसमाधान लाभणार नाही, कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी जाईल तेव्हाही तो प्रतिकुलच होईल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत बुध असून तोही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे संततीपासून मनस्ताप सहन करावा लागेल. शिवाय कसली तरी भीती अस्वस्थ करील. या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे या राशीच्या काही नोकरदार मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याचा मोह निर्माण होईल. पण त्यांनी तसा विचारही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत मंगळ व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यांच्यामुळे स्वभाव हट्टी, अहंकारी , असा घडेल व त्यामुळे अकारण शरीरपीडा, दगदग होणे संभवते. शनि -मंगळ हे शत्रू ग्रह एकत्र असल्यामुळे अनारोग्य होणे, नोकरी-व्यवसायात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे, नियोजित कार्यात अडचणी,अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. शनीमुळे कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होणे संभवते. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या

उत्तरार्धात येथील मंगळ  या राशीच्या धनस्थानी मीन  राशीत जात आहे. त्या काळात सुद्धा तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. शिवाय आर्थिक समस्याही  त्रस्त  करतील. या धनस्थानी मीन राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून  असे तीन ग्रह आहेतच. गुरु-शुक्रामुळे  कौटुंबिक सुख लाभेल व कुटुंबात शुभ घटना घडणे व अर्थलाभ होणेही संभवते.  स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होणे संभवते. पण नेपच्यूनमुळे  आर्थिक समस्या निर्माण होण्याची शक्यताही  दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत रवि -राहू -हर्षल  असे तीन ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या  सप्ताहात  धनस्थानी असलेला शुक्र तृतीय स्थानी मेष राशीत येत आहे.  येथील रवि -राहू  हे दोन्ही ग्रह अनुकुल  होतील व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात  हातून कर्तृत्व  घडेल व  वरिष्ठ प्रभावित होतील. त्यामुळे या राशीच्या मंडळींचे  आरोग्य उत्तम राहील व काही नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ होणे संभवते. क्वचित कोणाचा सन्मान होण्याची  तर कोणास एखादे उच्च  पद  मिळण्याची शक्यताही आहे. पण येथील राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची दाट  शक्यता दिसते. येथील  हर्षल  उच्च बौद्धिक  व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय  काही  मंडळींना परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यताही आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात तृतीय स्थानी आलेला शुक्रही लाभदायक होईल. येथील रवि  महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ  राशीत जात आहे. त्या काळी तो

प्रतिकुल  होईल व त्याच्यामुळे कार्य दिरंगाई होणे, अनारोग्य होणे अशापैकी कारणांनी  मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत प्रथमपासून बुध  आहेच. त्याच्यामुळे गृहसौख्य, मित्रसुख मिळेलच; पण धननाश  होण्याचीही दाट  शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा  राशीत केतू  असून त्याच्यामुळे काही मंडळींचे  आचरण ढोंगी प्रकारचे  होईल व संतति सुखात  बाधा येण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर शिवशंकराची  व श्रीहनुमंताची उपासना  मन:शक्ती व मन:शांती देईल. त्यासाठी दररोज सकाळी  स्नान झाल्यावर  मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री  झोपी जाण्यापूर्वी  “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.  त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र  धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र  शततारका  आहे त्यांनी “ ओम वरुणाय नमः:” तारक  मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा -भाद्रपदा आहे त्यांनी “ओम  अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा  १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन**  - या राशीच्या अष्टम  स्थानी तुळा  राशीत केतु  असून त्याच्यामुळे स्वभाव  चंचल, लहरी असा होणे संभवते. या राशीच्या  व्ययस्थानी कुंभ राशीत मंगळ  व शनि  असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल  होतील व  त्यांच्यामुळे आर्थिक समस्या व आर्थिक लचांड  उदभवतील. जपा.  शिवाय त्यांच्यामुळे

वाद, भांडणे होतील व असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यातून मानहानी होऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील मंगळ या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत येत आहे. त्या काळात स्वभाव हट्टी आणि अहंकारी असा होईल व अकारण शरीरपीडा, श्रम, दगदग होईल व त्यातून अनारोग्य होणे संभवते. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत प्रथमपासून गुरु-शुक्र-नेपच्यून असे तीन ग्रह आहेतच. पैकी गुरु-शुक्रामुळे आरोग्य उत्तम राहील, वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. तसेच गुरुमुळे बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. येथील शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या धनस्थानी मेष राशीत जात आहे. त्यावेळी सुद्धा तो अनुकुलच होईल व कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. पण नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होईल, त्यातून जलद संवेदना निर्माण होतील, उदासीनता येईल व गहिरे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत प्रथमपासून रवि -राहू-हर्षल असे तीन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात आणि हर्षल -राहू संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. राहूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील व कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. हर्षलमुळे मनस्थिती अति अस्थिर, चंचल अशी होईल, कोणाचा धाक, दडपण सहन होणार नाही व अविचाराने नको ते केले जाईल. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे, हेही समजणार नाही. येथील रविमुळे विशेष करून डोळ्याचे अनारोग्य त्रस्त करील व आर्थिक समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल, आरोग्य उत्तम राहील व शासकीय नोकरी असणारांपैकी काही मंडळींवर वरिष्ठ खूष होतील. त्यातून काही मंडळींना बढती मिळेल तर क्वचित कोणाचा सन्मानही होईल. त्याशिवाय एखाद्यास एखादे उच्च पद मिळणेही शक्य दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी प्रथमपासून बुध ग्रह आहेच. पण त्याच्यामुळे हितशत्रूंपासून धोका असून अकारण शत्रुत्व निर्माण होणेही व .राजद्रोह होणेही संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी " ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====०००००0०००००=====